**"मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना" राबविण्याकरीता सूचना निर्गमित करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**R&FD-86032/8/2026-FAR-REV-REVENUE/(E-1794168)**

पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२

तारीख: १३ ऑगस्ट, २०२६

**संदर्भ** -: १. महसूल व वन विभाग, शा.क्र.प्र/२०२५-लवेसू.क्र .नि.०२/पाणंद रस्ते, दि .१४.१२.२०२५

२. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. ०७.०१.२०२६

३. महसूल व वन विभाग, शा. शु. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. १८.०२.२०२६

४. महसूल व वन विभाग, शा. शु. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. २५.०३.२०२६

५. महसूल व वन विभाग, शा. शु. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/(E-१६२२३९६)/पाणंद रस्ते, दि. १५.०४.२०२६

६. महसूल व वन विभाग, शा.नि.क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र.०२(E१६६२६५५)/पाणंद रस्ते, दि.२२.०६.२०२६

७. महसूल व वन विभाग, शा.नि.क्र. R&FD-८६०३२/३/२०२६-FAR -REV-REVNUE/ (E-१७५६३४२), दि.१५.०७.२०२६

८. महसूल व वन विभाग, शा.शु.क्र. R&FD-८६०३२/३/२०२६-FAR -REV-REVNUE/ (E-१७५६३४२), दि.२४.०७.२०२६

९. महसूल व वन विभाग, शा.नि.क्र. R&FD-८६०३०/५/२०२६-FAR-REV-REVENUE/ (E-१७६८६२७), दि.२४.०७.२०२६

१०. महसूल व वन विभाग, शा.नि.क्र. R&FD-८६०३२/६/२०२६-FAR - REV-REVENUE / (E-१७६१०२६), दि.२४.०७.२०२६

११. महसूल व वन विभाग, शा.नि.क्र. R&FD-८६०३२/७/२०२६-FAR - REV-REVENUE (E-१७६३४९४), दि.२८.०७.२०२६

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये, "मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना" सुरु करणे व ती राबविण्याकरीता सोपी व सुलभ कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान क्षेत्रियस्तरावर येत असलेल्या अडचणींचा विचार करता, योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावी, गतिमान व सुलभ करण्यासाठी दिनांक १४.१२.२०२५ व तद्नंतरच्या शासन निर्णयांमध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्याअनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

**१.** संदर्भिय शासन निर्णयांमधील तरतुदीस अनुसरुन ज्या जिल्ह्यांमध्ये कार्यवाही पूर्ण झालेली आहे व त्याप्रमाणे अंमलबजावणी सुरु झालेली असेल त्या ठिकाणी सन २०२६-२७ करीता उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदींप्रमाणे कामे पूर्ण करावीत.

२. संदर्भिय शासन निर्णयांमधील तरतुदीस अनुसरुन ज्या जिल्ह्यांमध्ये अद्याप कार्यवाही सुरु आहे व अंमलबजावणी सुरु झालेली नाही अशा ठिकाणी तसेच पुढील आर्थिक वर्ष म्हणजेच सन २०२७-२८ करीता पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-

**अ) जिल्हास्तरीय समितीने तांत्रिक अर्हता** (Technical Qualification) **निश्चित करुन प्रति तास दर** (L१ rate) **अंतिम करावेत.**

**ब) सदरचे दर अंतिम करण्याच्या प्रक्रियेदरम्यान जिल्हास्तरावर कंत्राटदारांकडून कोणतीही** Performance Security म्हणून सुरक्षा ठेव घेऊ नये.

क) **जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेली तांत्रिक अर्हता** (Technical Qualification) **व अंतिम केलेला प्रति तास दर** (L१ rate) **आधारभूत मानून सदर तांत्रिक अर्हतेस पात्र ठरणा-या कंत्राटदारांची यादी विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीने तयार करावी व जिल्हास्तरीय समितीने अंतिम केलेल्या प्रति तास दरामध्ये** (L१ rate) **काम करणा-या जास्तीत जास्त कंत्राटदारांचे पॅनेल विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीने तयार करावे.**

**ड) विधानसभा क्षेत्रस्तरावर पात्र ठरलेल्या कंत्राटदारांच्या पॅनेलमधून कामाचे वाटप करताना त्याच विधानसभा क्षेत्रातील पात्र स्थानिक कंत्राटदारांना प्राधान्य देणेत यावे. स्थानिक कंत्राटदार इच्छुक नसतील तर जिल्हास्तरारीय कंत्राटदारांना प्राधान्य द्यावे.**

**इ) सदर कंत्राटदाराला देण्यात आलेल्या कामाच्या रकमेच्या** २ **टक्के इतकी रक्कम सुरक्षा ठेव** (Security Deposit) **म्हणून घेण्यात यावी. याव्यतिरीक्त अतिरिक्त सुरक्षा रक्कम घेण्यात येऊ नये. दोष दायित्व कालावधी** (Defect Liability Period) **संपल्यानंतर सुरक्षा ठेव रक्कम परत करण्यात यावी.**

**३. यापुर्वी अन्य योजनेतून झालेल्या कामांचा समावेश:-**

गाव नकाशांवरील रस्ते हे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ कलम २० मधील तरतुदीनुसार शासनाच्या मालकीचे आहेत. त्यामुळे सदर रस्त्यांची कामे मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेच्या मापदंडाप्रमाणे झाल्यानंतर ज्या शेत रस्त्यांवर यापुर्वी इतर कोणत्याही योजनेतून मातीकाम/मुरुमीकरण पूर्ण

झाले असून त्यास किमान एक वर्षाचा कालावधी झालेला आहे याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेकडून प्राप्त झाल्यानंतर, अशा रस्त्यांचा मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेमध्ये समावेश करता येईल. अशा रस्त्यांची खडीकरणापर्यंतची कामे करण्याची मुभा राहील. खडीकरणाकरीता प्रती किलोमीटर लागणारा खर्च जिल्हास्तरीय समितीने ठरवून द्यावा. मात्र कोणत्यही परिस्थितीत अशा रस्त्यांच्या डांबरीकरणाची कामे मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेअंतर्गत घेता येणार नाहीत.

**४.** मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेमध्ये ज्या कामांना फक्त प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे मात्र अद्याप काम सुरु करण्यात आलेले नाही किंवा निधी वितरण करण्यात आलेले नाही असे रस्ते मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेअंतर्गत घ्यावयाचे असल्यास सदर रस्त्यांना मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेमध्ये दिलेली प्रशासकीय मान्यता संबंधित विभागाने रद्द करावी. सदरची प्रशासकीय मान्यता रद्द झाल्याची खातरजमा केल्यानंतरच हे रस्ते मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेअंतर्गत घेता येतील. याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित जिल्ह्याचे उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांची राहील.

**५.** जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपरोक्त सूचनांप्रमाणे वेबपोर्टलमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

**६. उपरोक्त बदलाव्यतिरिक्त संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदी कायम राहतील.**

**७.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१३१५३८३१२९४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRATAPSINH
MACCHINDRA KHARAT

Digitally signed by PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=0e963b9a3b438beeb9634a49f8df67395a23cc57553bf278360d37dc7d2fbada, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E85A4EBC6765D49CC36FAB03572D08CB3773059876920F924659873AA200A822, cn=PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
Date: 2026.08.13 15:40:01 +05'30'

**(प्रतापसिंह म. खरात)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

४. मा. उपमुख्यमंत्री (नियोजन व वित्त), महाराष्ट्र शासन यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,

५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

६. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

७. मा. लोकसभा/राज्यसभा सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,

८. मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,

९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,

१०. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मुंबई,

११. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे

१२. सर्व विभागीय आयुक्त

१३. आयुक्त, नरेगा नागपूर

१४. आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे

१५. सर्व जिल्हाधिकारी.

१६. सर्व पोलीस अधिक्षक

१७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

१८. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

१९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरिता)

२०. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र 1 व 2. मुंबई व नागपूर.

२१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र 1 व 2. मुंबई व नागपूर.

२२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

२३. सर्व उपसचिव/सर्व अवर सचिव व सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

२४. निवडनस्ती (पाणंद रस्ते)